महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ परीक्षेच्या अभ्यासक्रमात बदल करण्याबाबत.

प्राप्त झाले सही.....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- सेवाप्र -२०१६/प्र.क्र.४८/कोषा प्रशा-३,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०१६,

वाचा:- १. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :- DAT-१०६४/५८४-C/XII, दि. ०१/०२/१९६५.
२. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:- सेवाप्र २०१६/प्र.क्र.४८/कोषा प्रशा-३, दि.२० जुलै, २०१६.

वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :- सेवाप्र २०१६/प्र.क्र.४८/कोषा प्रशा-३, दि.२० जुलै, २०१६ अधिक्रमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक :- DAT-१०६४/५८४-C/XII, दि. ०१/०२/१९६५ मधील परिशिष्ट [क] मध्ये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ चा अभ्यासक्रम विहित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ही परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित केली जाते. ही परीक्षा शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा असून ही परीक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी सहाय्यक लेखा अधिकारी या पदावर थेट नियुक्तीस पात्र ठरतात. संचालनालयातील परिविक्षाधीन वर्ग-२ चे अधिकारी यांना त्यांच्या परिवीक्षधीन कालावधी पूर्ण करण्यासाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

या परीक्षेसाठी विहित केलेल्या मूळ अभ्यासक्रमातील काही संदर्भ पुस्तके आता छपाई होत नसल्याने दुर्मिळ झाली आहेत. तसेच शासनाकडून काही नियमांमध्ये नवीन सुधारणा व नवीन प्रणाली कार्यान्वित झाल्यामुळे या पुस्तकातील काही नियम कालबाह्य झाले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. ०९/०९/२०१५ च्या पत्रान्वये या परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा आढावा घेऊन कालबाह्य विषय वगळण्याबाबत किंवा त्यामधील प्रकरणांची संख्या कमी करुन पर्यायाने प्रश्नपत्रिकांची संख्या कमी करण्याबाबत शासनाला कळविले होते. शासनाने कार्यान्वित केलेल्या नवीन तंत्रज्ञानामुळे या परीक्षेसाठी विहित अभ्यासक्रमाचे व प्रश्नपत्रिकांचे स्वरुप सुधारित करण्याची नितांत आवश्यकता होती. या सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन या परीक्षेचा अभ्यासक्रम सुधारित करण्याची आणि परीक्षा आत्मनिष्ठ (Subjective) स्वरुपाची करण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

शासन निर्णय क्रमांक :- DAT-१०६४/५८४-C/XII, दि. ०१/०२/१९६५ मधील परिशिष्ट [क] मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ या परीक्षेसाठी यापुढे खालील ४ प्रश्नपत्रिका असतील आणि त्यातील विषय व अभ्यासक्रम खालील प्रमाणे असतील.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग ३ परीक्षा अभ्यासक्रम (पुस्तकाशिवाय)

पे.क्र.	विषय	अभ्यासक्रमाबाबत शुध्दीपत्रकाकरीता प्रस्तावित विषय
१	सेवाविषयक बाबी व त्याअनुंषगाने आचरायची कार्यालयीन कार्यपध्दती विभाग अ - ४० विभाग ब- ६०	<u>विभाग अ)</u> प्रात्यक्षिक प्रश्न महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सर्वसाधारण शर्ती, वेतन, रजा, स्वियेत्तर सेवा इत्यादी.) १. वेतन निश्चिती, पदग्रहण अवधी, निर्वाह भत्ता, निवृत्तीवेतन व रजा वेतन यांचे अंशदान (स्वियेत्तर सेवा). २. निवृत्तीवेतन विषयक प्रकरणे तयार करणे व निवृत्ती वेतन विषयक लाभांची व त्यातून मिळणा-या लाभाची परिगणना करणे ३. प्रवासखर्चाची देयके व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देयके तयार करणे.व गट विमा योजना १९८२ ची परिगणना <u>विभाग ब)</u> सैध्दांतिक १. ज्येष्ठता सूची तयार करणे, बिंदुनामावली ठरविणे, पदोन्नतीची कार्यपध्दती, जात वैधता दाखला व त्या अनुंषगीक प्रकरणे २. महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील, वर्तणूक नियम १९७९ ३. विधानमंडळ कार्यपध्दती व त्या अनुंषगाने येणा-या तारांकित व अतारांकित प्रश्न, कपात सूचना इ.बाबत करावयाची कार्यवाही.
	Service Matters and Procedure to be adopted accordingly. Part A- 40 marks Part B- 60 marks	Part A) Practical Questions Mahrashtra Civil Services Rule (General Condition, pay, leave, Foreign Services etc.) 1. Pay Fixation, Joining Time, Subsistance Allowance. Pension and leave salary contribution (Foreign Services). 2. Preparation of Pension cases & Calculation of Pensionary benefits 3. Preparation of TA Bills, Medical Reimbursement Bills and calculation of GIS. Part B) Theoretical Questions 1. Preparation of Seniority List, Maintenance of Roster, Promotion procedure, Caste Validity Certificate related issues 2. Maharashtra Civil Services (Conduct, Discipline & Appeal) Rules 1979 3. Procedure of Maharashtra legislative Assembly and appropriate action to be taken in respect of starred and unstarred questions, cut motion etc.

२	व्दिनोंद लेखापध्दती ची मुलभूत संकल्पना व करपध्दतीबाबत मुलभूत संकल्पना विभाग अ - ७० गुण विभाग ब - ३० गुण	<u>विभाग अ)</u> प्रात्यक्षिक प्रश्न १. लेखांकन करण्याचे तीन सुवर्ण नियम. २. व्दीनोंद लेखांकनाची मुलतत्वे. ३. ना नफा संघटनेचे लेखे विवरणपत्र. ४. कीर्द नोंदी ५. खतावण्या तयार करणे. ६. बँक ताळमेळ विवरणपत्रे ७. लेखांकनातील चूकांची दुरूस्ती ८. घसारा <u>विभाग ब) सैध्दांतिक प्रश्न (फक्त इंग्रजीत)/वस्तुनिष्ठ (Objective).</u> Income Tax Act 1961 Chapter III Section 10 (Incomes not included in total income) Chapter IV (Computation of Total Income) Sec.14, 14 A, 15,16 & 17 ChapterVI A (Deduction to be made in Computing Total Income) Sec. 80A to Sec. 80GGA Chapter XVII (Collection and Recovery of Tax) Sec. 190 to 194, 198 to 206 AA
	Basic concepts of Double Entry Book Keeping & Important concepts of Taxation (Without books) Part A -70marks Part B -30marks	Part A) Practical Questions 1. Three Golden Rules of Accounting. 2. Concepts of Double entry accounting. 3. Statement of Accounts of Non Profit Organization (charitable Institutions) 4. Journal Entries 5. Preparation of ledgers 6. Bank Reconciliation statement 7. Rectification of Errors in accounts 8. Depreciation Part B) Theoretical Questions (English medium only) (Objective) 1. Income Tax Act 1961 Chapter III Section 10 (Incomes not included in total income) Chapter IV (Computation of Total Income) Sec.14, 14 A, 15,16 & 17 Chapter VI A (Deduction to be made in Computing Total Income) Sec. 80A to Sec. 80GGA Chapter XVII (Collection and Recovery of Tax) Sec. 190 to 194, 198 to 206 AA
३	वित्त विभागाने सुरू केलेल्या ई-गव्हर्नन्स संगणकीय प्रणाली, खरेदी पध्दती , भांडार पडताळणी	<u>विभाग अ)</u> प्रात्यक्षिक प्रश्न सेवार्थ, बीम्स, पेन्शन प्रणाली, ग्रास, प्रणाली, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, ट्रेझरी नेट, बील पोर्टल

	विभाग अ - ७० गुण विभाग ब - ३० गुण E-Governance initiatives of the Finance Dept., Purchase Procedures and Store Verification Part A - 70 Part B - 30	<u>विभाग ब) सैध्दांतिक</u> १.शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. ३०.१०.२०१५ नुसार खरेदी पध्दती २.भांडार पडताळणी कर्मचा-यांसाठी निर्देश पुस्तिका Part A)Practical Questions Sevarth, Beams, Pension Software, Grass, NPS, Treasury Net, and Bill Portal Part B) Theorotical Questions 1. Purchase Procedure as per Govt. of Maharashtra Industry, Energy and Labour Dept. G.R.dt. 30.10.2015 2. Instruction Manual for Store verification staff
४	कायदे, नियम व लेखासंहिता विभाग अ - ७० गुण विभाग ब - ३० गुण	कायदे व नियम विभाग अ) १. नागरी लेखा नियमपुस्तिका १९९० मधील लेखे महालेखापालास सादर करावयाची पध्दती अ) अधिदान व लेखा कार्यालयात व कोषागारात लेख्यांचे संकलन करण्याची पध्दत व एकत्रित लेखे (classified accounts) तयार करण्याची पध्दत ब) लेख्यांतील चुकांची दुरूस्तीची पध्दत २. मुंबई वित्तीय नियम, १९५९ ३. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ ४. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियमपुस्तिका १९६५ ५. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम ६. मुंबई नगरपालिका लेखासंहिता ७. जिल्हा परिषद लेखा संहिता ८. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० आणि मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३१ विभाग ब) १. अनुदानाचे अंतिम लेखांकन (FMG) ची पध्दत २. लेख्यांचे ताळमेळ व निर्धारणाची पध्दत ३. विनियोजन लेखे, ४. लोकलेखा समिती प्रकरणे ५. महालेखापाल लेखापरीक्षण व निरीक्षण परिच्छेदांच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही PART (A) 1. Civil Accounts Manual 1990 (procedure of submitting accounts to A.G) a) Procedure of preparation of Consolidated Account and classified Account of Treasury/Pay & Accounts/A.G b) Rectification of errors

	Acts, Rules and Account Codes Part A – 70 Part B - 30	2. Bombay Financial Rules, 1959 3. Bombay Treasury Rules, 1968 4. Maharashtra Contingent Expenditure Rule 1965 5. ZP & Panchayat samiti Act & Rule 6. Muncipal Account code 7. ZP Account code 8.The Bombay Local Fund Audit Act, 1930 and Bombay Local Fund Audit Rules 1931 PART (B) 1. Procedure regarding final modified grant 2. Reconciliation of Accounts, Rectification of Errors and Note of error 3.Appropriation account 4. PAC matters 5.Procedure regarding Inspection paras & audit paras raised by A.G.

शासकीय कामकाजाच्या दृष्टीने अभ्यासक्रमामधील आवश्यक असणारे सर्व घटक कायम ठेवून उपरोक्त नमूद अभ्यासक्रम विहित करण्यात आला आहे. सुधारित अभ्यासक्रम व प्रश्नपत्रिकांचे आत्मनिष्ठ (Subjective) स्वरूप यासाठी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील तज्ञ अशा कार्यरत / सेवानिवृत्त अधिका-यांची मदत घेऊन परीक्षेसाठी उपयुक्त अशा माहिती पुस्तिका लेखा व कोषागारे संचालनालयाने तयार करून घ्याव्यात. सुधारित अभ्यासक्रमानुसार नमुना प्रश्नपत्रिका व त्यांची उत्तरेही अधिका-यांकडून तयार करून घ्यावित.

सुधारित अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याबाबत अधिसूचना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शुभांगी शेठ)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र-1,मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
सर्व सहसंचालक, लेखा व कोषागारे
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व सह संचालक, स्थानिक निधी लेखा.
सर्व कोषागार अधिकारी.
मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
निवड नस्ती / कोषा (प्रशा-3)